# महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना


## २६ वा वार्षिक अहवाल

## सन २०२१ - २२




### व्यवसाय वृद्धी

(आकडे कोटीमध्ये)



## अधिमंडळाची वार्षिक बैठक सूचनापत्र

**(फक्त सभासदांकरीता)**

**महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालनाची सन २०२१-२२ ची अधिमंडळाची २६ वी वार्षिक बैठक रविवार, दिनांक ११ / ०९ / २०२२ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता सी.टी.एम.के. गुजराथी विद्यालय, जालना येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. श्री. जगन्नाथ रामभाऊ खंडागळे यांचे अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, हि नम्र विनंती.**

### बैठकीपुढील विषय :

१) दि. २९/०८/२०२१ रोजी झालेल्या अधिमंडळाचे मागील वार्षिक बैठकीचा वृतांत वाचून कायम करणे.
२) संचालक मंडळाच्या संस्थेच्या कार्याबद्दलच्या सन २०२१–२२ च्या वार्षिक अहवालाचे वाचन करणे व तो स्विकृत करणे.
३) सन २०२१-२२ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्विकृत करणे.
४) वैधानिक लेखापरीक्षकाचे सन २०२१–२२ चे लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
५) सन २०२०-२१ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे दोषदुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
६) कायदा व नियम यास अनुसरून संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
७) सन २०२२-२३ करीताचे उत्पन्न खर्चाचे व महसूल खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८) सन २०२१-२२ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रक तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
९) निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनालमधील पात्र वैधानिक लेखापरीक्षकाची चालू आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी नेमणूक करणे, लेखापरिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.
१०) संचालक मंडळ व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना दिलेल्या, वसूल व येणे कर्जाची कायदा कलम ७५(२)(१) नुसार माहिती घेणे.
११) उपविधी क्र. ६१(४) चे तरतुदीस अनुसरून ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीचा न नेलेला लाभांश राखीव निधीकडे वर्ग करणे.
१२) सुधारित कर्मचारी सेवानियमास मान्यता देणेबाबत.
१३) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळ यांचे आज्ञेवरून
स्वाक्षरीत
(शिवलिंग करदळे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : जालना
जा. क्र. : २०४ /२०२२
दिनांक : २५/०८/२०२२

---

टिप :

१) संस्थेचे उपविधी क्र. ३५(३) मधील तरतुदीनुसार सदर अधिमंडळाची वार्षिक बैठक गणपूर्तीअभावी होऊ न शकल्यास सदरील बैठक तहकूब करून, अर्ध्या तासाने त्याच दिवशी व त्याच ठिकाणी म्हणजे दि. ११/०९/२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचे विचारार्थ व निर्णयार्थ होईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना विषयपत्रिकेवरील विषयांचे अनुषंगाने काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी लेखी सूचना सभेचे आधी ७ दिवस या संस्थेच्या Email ID – **mahalaxmi.jalna@gmail.com** वर कार्यालयाकडे पाठविण्यात याव्यात.
३) ज्या सभासदांना सभेची नोटीस अथवा अहवाल पाहिजे असल्यास त्यांनी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या **7559394857** या क्रमांकावर **WHATSAPP** द्वारे मागणी करावी, किंवा संस्थेच्या वर नमूद Email ID वर Email द्वारे मागणी करावी, आलेल्या Whatsapp क्रमांकावर / Email ID वर PDF FORMAT मध्ये नोटीस व अहवाल पाठविण्यात येईल.
४) ज्या सभासदांनी संस्थेकडे मोबाईल नंबर नोंदवला नसेल किंवा संस्थेकडे नोंदवलेला मोबाईल नंबर बदलावयाचा असेल त्यांनी तो लगतच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत दिनांक ०५/०९/२०२२ पर्यंत नोंदवून / दुरुस्ती करून घ्यावा.

## * अहवाल वर्षात कार्यरत संचालक मंडळ *

श्री. दादाराव भाऊराव तुपकर
(अध्यक्ष)

सौ. अनुराधा किसनराव मिसाळ
(उपाध्यक्षा)

श्री. संतोष शंकरराव गुडधे, श्री. एकनाथ पंढरीनाथ कदम, श्री. श्रीरंग बापूराव भोईटे,
श्री. शामसुंदर भीमराव गिते, श्री. त्र्यंबक किसनराव मगर, श्री. पांडुरंग प्रभाकर मिरजकर,
श्रीमती सविता नामदेव पितळे, श्रीमती ज्योती माधवराव आचार्य
तज्ञ संचालक : सी.ए. अमोल बाळासाहेब मुळे, श्री. साहेबराव संतुकराव ढवळे

## * नवनिर्वाचीत संचालक मंडळ *

डॉ. जगन्नाथ रामभाऊ खंडागळे
(अध्यक्ष)

श्री. संतोष शंकरराव गुडधे
(उपाध्यक्ष)

श्री. दादाराव भाऊराव तुपकर, श्री. त्र्यंबक किसनराव मगर, श्री. किसन बाळाजी मिसाळ,
श्री. एकनाथ पंढरीनाथ कदम, श्री. भाऊराव आसाराम चव्हाण, श्री. विठ्ठल केरबा काचेवाड,
श्री. शरद बाबुराव खोत, श्री. सचिन भाऊराव टेकाळे, श्री. नितीन श्रीरंग भोईटे,
श्रीमती मंगला श्रीकांत शेलगावकर, श्रीमती वर्षा नामदेवराव पितळे.
तज्ञ संचालक : श्री. दिपक दादाराव तुपकर, ॲड. जगन्नाथ साहेबराव भुतेकर.

## * स्थानिक शाखा सल्लागार मंडळ *

### * वालसावंगी शाखा *

श्री. राजू अशोक भुते, श्री.अनिल सुधाकर जोडपे, श्री. हरिभाऊ विठोबा बेराड, श्री. नामदेव महादू लोखंडे,
श्री. रमेश गोविंदराव सुरडकर, श्री. राजू उत्तमराव उदरभरे, श्री. सोमनाथ मधुकरअप्पा घोडतुरे

### * रोहिलागड शाखा *

श्री. केशव नारायणराव तट्टू पाटील, श्री. अर्जुन भीमराव टकले, श्री. महादेव श्रीमंतराव हुसे

### * परतूर शाखा *

श्री. राजेश नागोराव अंभुरे, श्री. अशोक बिसनलाल सारडा, श्री. संतोष लक्ष्मणराव दिंडे,
श्री. नितीन रामदास खरात, श्री. रामराव अंशिराम काळे, श्री. धिरज विश्वासराव सोळुंके

### संस्थेच्या शाखा

| अ.क्र. | शाखा | पत्ता |
|---|---|---|
| १ | मुख्य शाखा, जालना | मस्तगड, जुना जालना, जालना |
| २ | वालसावंगी | मेन रोड, वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना. |
| ३ | नवा जालना | गणेश भुवन समोर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जालना. |
| ४ | रोहिलागड | रोहिलागड, ता. अंबड, जि. जालना. |
| ५ | परतूर | हर्षवर्धन कॉम्प्लेक्स, शासकीय विश्रामगृहासमोर, परतूर. |

## संस्था प्रगतीवर एक दृष्टीक्षेप

| तपशिल | ३१/०३/२०१८ | ३१/०३/२०१९ | ३१/०३/२०२० | ३१/०३/२०२१ | ३१/०३/२०२२ |
|---|---|---|---|---|---|
| १ सभासद संख्या | ३७२५ | ४६९९ | ५५९३ | ६३४५ | ६७०६ |
| २ सरासरी खेळते भांडवल | ४१,२७,९२,२४८/- | ४४,९९,०५,४२१/- | ४९,१७,८३,०८२/- | ५३,६१,१५,८६२/- | ५६,५५,४०,१०४/- |
| ३ स्वनिधी | ५,४४,४२,६१२/- | ६,०१,७९,९२६/- | ६,०७,८०,१७६/- | ६,१४,८८,६४०/- | ७,२३,८२,४७७/- |
| ४ वसूल भागभांडवल | २,४७,६२,२००/- | २,८२,३९,६००/- | २,९७,९४,०००/- | ३,११,४३,३००/- | ३,२५,१०,९००/- |
| ५ निधी/तरतुदी | ४,७१,३२,५२१/- | ५,९७,७१,८१०/- | ७,१२,९५,३१२/- | ८,३२,८७,६००/- | ९,८४,९१,६९३/- |
| ६ ठेवी | ३१,१८,७८,९०८/- | ३५,११,६३,९११/- | ३७,८८,४१,०४०/- | ४०,८२,२६,५७४/- | ४६,२०,२८,९०९/- |
| ७ गुंतवणूक (बँक) | ९,९५,३९,१३३/- | १२,१४,५६,०९९/- | १३,६२,४२,६२७/- | १३,२७,१३,४९५/- | १५,१४,६८,०११/- |
| ८ कर्ज वाटप (अहवाल वर्ष) | १५,४०,१८,०००/- | १८,७९,६५,०६२/- | २२,७२,६९,५४६/- | १८,७६,३२,१००/- | ३५,८९,००,२२९/- |
| ९ कर्ज वसुली (अहवाल वर्ष) | १२,१०,५१,२२२/- | १६,६८,८३,५८८/- | २०,७५,०२,५७४/- | १५,०६,३६,९३९/- | ३२,०६,२८,१९१/- |
| १० येणे कर्जबाकी | २४,४२,२६,१९३/- | २६,५३,०७,६६७/- | २८,५०,७४,६३९/- | ३२,२०,६९,८००/- | ३६,०३,४१,८३८/- |
| ११ थकबाकी (एनपीए) रु. | १,४७,२१,४६९/- | ४,२१,६१,०००/- | ४,३०,११,०००/- | ४,९४,००,३६८/- | ४,७२,६९,४४२/- |
| १२ ग्रॉस एन.पी.ए. % | ६.०३% | १५.८९% | १५.०९% | १५.३४% | १३.१२% |
| १३ नेट एन.पी.ए. % | ०.२३% | ८.९६% | ६.४०% | ७.२७% | ५.१५% |
| १४ मालमत्ता (स्थावर+जंगम) | १,६३,७२,५१६/- | १,६४,८५,७०८/- | १,४६,९४,६२८/- | १,४७,९०,२४१/- | १,५०,८६,४५४/- |
| १५ एकुण उत्पन्न | ४,३४,२७,१२४/- | ४,८३,३४,१७४/- | ५,२१,२१,८३६/- | ४,८६,१२,५५१/- | ५,२६,००,१०७/- |
| १६ एकुण खर्च (तरतुदीसह) | ३,७२,९७,६१७/- | ४,१८,६८,२९९/- | ४,५०,९८,८९६/- | ४,१५,५३,४३९/- | ४,५३,७०,२९४/- |
| १७ नफा | ६१,२९,५०७/- | ६४,६५,८७५/- | ७०,२२,९४०/- | ७०,५९,११२/- | ७२,२९,८१३/- |
| १८ लाभांश | १०% | १०% | १०% | १०% | (प्रस्तावित) १०% |
| १९ सी.डी.रेशो | ६९.४१% | ६६.५२% | ६७.६५% | ७१.२३% | ६९.३३% |
| २० दैनंदिन रोख तरलता (CRR) | २.६९% | ४.८७% | २.५३% | २.८०% | ३.८८% |
| २१ वैधानिक तरलता (SLR) | ३१.९२% | ३४.५९% | ३५.१२% | ३४.७७% | ३०.०६% |
| २२ लेखापरीक्षण वर्ग | अ | अ | अ | अ | अ |

## अंदाज पत्रक २०२२-२३ करिता (रक्कम रु. लाखात)

| अंदाजित खर्च | रक्कम | अंदाजित उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|
| ठेवीवरील व ईतर व्याज | ३४६.५० | कर्ज व्याज | ४५०.०० |
| कर्मचारी पगार | ७५.०० | बँक गुंतवणूक व्याज | १२०.०० |
| कर्म.भ.निधी व ग्रॅच्युईटी | २०.०० | ईतर उत्पन्न | १७.०० |
| एजंट कमिशन | ६.५० | | |
| ऑडीट व प्रोफेशन फी | २.०० | | |
| टॅक्स, विमा व कार्यालय भाडे | १२.०० | | |
| स्टेशनरी छपाई व खरेदी | ३.०० | | |
| लाईट,फोन व इंटरनेट | ३.०० | | |
| दुरुस्ती व देखभाल | २.५० | | |
| ईतर खर्च | १३.०० | | |
| घसारा व ईतर तरतुदी | ३०.०० | | |
| एकूण खर्च | ५१३.५० | एकूण उत्पन्न | ५८७.०० |
| नफा | ७३.५० | --- | -- |
| एकूण उत्पन्न | ५८७.०० | एकूण उत्पन्न | ५८७.०० |

SHRUTIKA V LOHADE
CHARTERED ACCOUNTANT
M. No. : 175799

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल

( महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कलम ८१ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ६९ (३) अंतर्गत )

१) आम्ही, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना, मुख्य कार्यालय मस्तगड, जुना जालना, जालना (महा) ४३१२१३ नोंदणी क्रमांक : जे.ए.एल./जे.ए.एल./आर.एस.आर./सी.आर-३४८/१९९५-९६ दिनांक १९/०२/१९९६ असून, या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च २०२२ रोजीच्या तेबंदाचे आणि सोबत जोडलेल्या त्या तारखेला संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफा-तोटा पत्रकाचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. हि वित्तीय पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या प्रबंधकाची असून आमची जबाबदारी या वित्तीय पत्रकावर लेखापरीक्षणाच्या आधारे आमचे मत प्रदर्शित करण्याचे आहे.

२) आम्ही आमचे लेखापरीक्षण भारतात सामान्यत : मान्यता पावलेल्या लेखापरीक्षण मापदंडाच्या आधारे केले आहे. या मापदंडाप्रमाणे आम्हाला वित्तीय पत्रके मोठ्या दोषांपासून मुक्त असल्याचा पूर्ण विश्वास निर्माण होईल. अशा पद्धतीने लेखापरीक्षण आणि त्याची पूर्ण योजना करावी लागते. लेखापरीक्षणात चाचणी तत्वावर वित्तीय पत्रकातील रकमा आणि खुलासे यांना आधार देणाऱ्या पुराव्यांचे परीक्षण अंतर्भूत असते. लेखापरीक्षणात प्रबंधनाने केलेले महत्वाचे अंदाज, वापरलेली लेखातत्वे आणि वित्तीय पत्रकाचे एकंदरीत प्रदर्शन यांचे मूल्यमापण करणे देखील अंतर्भूत असते. आम्ही कलेले लेखापरीक्षण आमच्या मतास पुरेसा आधार देते, असा आमचा विश्वास आहे. आम्ही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मर्यादा आणि महाराष्ट्र सक्री संस्था अधिनियम १९६० तसेच नियम १९६१ त्या अंतर्गत येणाऱ्या प्रदर्शनाच्या मर्यादा यांना अधीन राहून अहवाल देतो कि,

अ) आम्ही आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे लेखापरीक्षणकरिता आवश्यक ती सर्व माहिती व स्पष्टीकरण मिळविली आहेत.

आ) आम्ही केलेल्या परीक्षनाच्या आधारावर, आमच्या मते, आमच्या अहवालातील भाग अ, व व क मधील टिका-टिपणीस अधीन राहून, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०, नियम १९६१ व संस्थेच्या पोटनियमानुसार आवश्यक असणारी लेखापुस्तके संस्थेने ठेवलेली आहेत.

इ) आमच्या अहवालातील भाग अ, ब व क मधील टिका- टिपणीस अधीन राहून ताळेबंद व नफा - तोटा पत्रक संस्थेच्या लेखापुस्तकाशी जुळते.

ई) आमच्या मते व आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि आम्हाला मिळालेल्या स्पस्टीकरणाप्रमाणे आणि भारतात सामान्यत : मान्यता पावलेल्या लेखातत्वाप्रमाणे आणि अहवालातील भाग अ,ब व क मधील टिका- टिपणी ना अधीन राहून, संस्थेच्या वित्तीय लेखा ताळेबंदाच्या बाबतीत ३१/०३/२०२२ रोजीची सत्य व वास्तविक आर्थिक दर्शवितो. नफा - तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या तारखेला संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवितो.

**उ) नागरी सहकारी पतसंस्था यांचे लेखापरीक्षणाच्या वर्गवारीच्या निकषास अनुसरून, संस्थेस प्राप्त गुणानुसार आर्थिक वर्ष २०२१-२०२२ या कालावधीसाठी संस्थेला लेखापरीक्षण वर्ग " अ " देण्यात आला आहे.**

स्थळ : जालना
दिनांक : २०/०७/२०२२

SHRUTIKA V LOHADE M. No. 175799 CHARTERED ACCOUNTANT

श्रुतिका विनोद लोहाडे
(सनदी लेखापाल / सी.ए.)
नामतालिका क्रमांक : १०१४४१० वर्गवारी : ग्रेड B-1

• 10, Chandragupta Nagari, Near CIIGMA Hospital, Shahnoorwadi, Aurangabad - 431 005.
M. : 8275237782 E-mail : shrutikalohade29@gmail.com

| आर्थिक वर्ष २०२१-२२ नफा विभागणी शिफारस | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
| १ | राखीव निधी (किमान २५%) | १८,१०,०००.०० |
| २ | सभासद लाभांश १०% | ३१,३०,७७१.०० |
| ३ | सभासद कल्याण निधी | २,००,०००.०० |
| ४ | कॉन्टीजेन्सी तरतुद | २०,००,०००.०० |
| ५ | उर्वरित नफा ईमारत निधीस वर्ग | ८९,०४०.७५ |
| | एकूण नफा : | ७२,२९,८११.७५ |

## एकत्रित ताळेबंद पत्रक [३१/०३/२०२२ अखेर] (नमुना "न")

| मार्च,२०२१ अखेर | भांडवल व देणी | मार्च,२०२२ अखेर | मार्च,२०२१ अखेर | संपत्ती व येणी | मार्च,२०२२ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | अधिकृत भागभांडवल | ५,००,००,०००.०० | ११,२७,८२५.०० | रोख शिल्लक | ६,४५,०८८.०० |
| ३,११,४३,३००.०० | वसूल भागभांडवल | ३,२५,१०,९००.०० | १,६२,१२,१३३.६४ | बँक खाते शिल्लक | २,१२,२८,७०४.२१ |
| १,५३,७१,३७७.०० | राखीव निधी | १,७२,७३,७०१.०० | १३,२७,१३,४९५.०० | बँक गुंतवणुक | १५,१४,६८,०११.०० |
| ४०,८२,२६,५७४.४२ | ठेवी | ४६,२०,२८,९०८.६२ | २०,०००.०० | भागातील गुंतवणुक | २०,०००.०० |
| २९,२०,२६८.०० | ठेव देणे व्याज | ३३,४०,७२५.०० | १,५३,९०,३१०.०० | निधी गुंतवणुक | १,७३,३२,१७७.०० |
| ६,७९,१६,२२२.६५ | निधी व तरतुदी | ८,१२,१७,९९२.१९ | ४,८४,७७५.०० | ईतर गुंतवणुक | ५,४९,७७५.०० |
| ३४,७९,००७.२७ | अनामती व ईतर देणी | ३२,०२,८९१.३३ | ३२,२०,६९,८००.०० | येणे कर्ज | ३६,०३,४१,८३८.४२ |
| ७०,५९,११२.५४ | एकुण नफा | ७२,२९,८११.७५ | २,९६,३८,३९१.०० | येणे कर्ज व्याज | ३,५७,७७,७३७.०० |
| | चालू वार्षिक – ७२,२९,८११.७५ | | ३६,६८,८९१.५८ | ईतर येणी | ४३,५५,१४५.७४ |
| | | | ८३,३८,८९०.६६ | जंगम मालमत्ता | ८६,३५,१०३.५२ |
| | | | ६४,५१,३५०.०० | स्थावर मालमत्ता | ६४,५१,३५०.०० |
| ५३,६१,१५,८६१.८८ | एकूण : | ६०,६८,०४,९२९.८९ | ५३,६१,१५,८६१.८८ | एकूण : | ६०,६८,०४,९२९.८९ |

## एकत्रित नफा-तोटा पत्रक [०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२] (नमुना "न")

| मार्च,२०२१ अखेर | खर्च बाजु | मार्च,२०२२ अखेर | मार्च,२०२१ अखेर | उत्पन्न बाजु | मार्च,२०२२ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| २,९३,२५,६६७.०० | दिलेले व्याज | २,९३,१२,२४५.०० | ३,६९,१५,८३८.०० | कर्ज व्याज | ४,२२,६६,६४५.०० |
| ५६,९१,२८७.०० | कर्मचारी पगार | ६५,४९,७२१.०० | १,०१,५८,०६०.०० | बँक गुंतवणुकीवरील व्याज | ८९,५९,११८.०० |
| ७,७४,९६४.०० | कर्म.भविष्य निधी व ग्रॅच्युईटी | ८,११,४१८.०० | १५,३८,६५३.१३ | ईतर उत्पन्न | १३,७४,३४३.६९ |
| ५,०४,३०५.०० | एजंट कमिशन | ६,२३,९३६.०० | | | |
| ५७,२२०.०० | ऑडीट व प्रोफेशन फी | ४०,०००.०० | | | |
| १०,३३,९०७.०० | टॅक्स, विमा व भाडे | ९,९६,७२२.०० | | | |
| ९७,६५९.२८ | स्टेशनरी छपाई व खरेदी | १,१५,७४१.१५ | | | |
| २,२७,०९४.०० | लाईट, फोन व इंटरनेट | १,९६,२८८.१० | | | |
| १,३४,१५५.२५ | दुरुस्ती व देखभाल | १,१८,२८७.७८ | | | |
| ८,२२,१६४.०६ | ईतर खर्च | ११,१०,१७८.९१ | | | |
| २८,८५,०१६.०० | घसारा व ईतर तरतूदी | ५४,९५,७५७ | | | |
| ४,१५,५३,४३८.५९ | एकुण खर्च | ४,५३,७०,२९४.९४ | ४,८६,१२,५५१.१३ | एकुण उत्पन्न | ५,२६,००,१०६.६९ |
| ७०,५९,११२.५४ | नफा | ७२,२९,८११.७५ | -- | -- | -- |
| ४,८६,१२,५५१.१३ | एकुण उत्पन्न | ५,२६,००,१०६.६९ | ४,८६,१२,५५१.१३ | एकुण उत्पन्न | ५,२६,१०६.६९ |

## सन २०२१-२२ अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा अधिकचा झालेला खर्च (रक्कम रु. लाखात)

| खर्च खाते तपशिल | अंदाजपत्रकीय खर्च | प्रत्यक्ष खर्च | जास्तीचा झालेला खर्च |
|---|---|---|---|
| १) कर्मचारी पगार व भत्ते | ६५.०० | ६५.५० | ०.५० |
| २) एजंट कमिशन | ४.०० | ६.२४ | २.२४ |
| ३) घसारा, एनपीए व ईतर तरतुदी | ३०.०० | ५४.९५ | २४.९५ |

# २६ वा वार्षिक अहवाल

## सन २०२१ - २०२२

सन्माननिय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेचा सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा अहवाल व हिशोब पत्रके, उत्पन्न खर्चाचे व महसुली खर्चाचे अंदाजपत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपल्यासमोर सादर करीत आहे.

**१) वार्षिक सर्वसाधारण सभा ( अधिमंडळाची वार्षिक बैठक) :**

संस्थेच्या अधिमंडळाची २५ वी वार्षिक बैठक कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अहवाल वर्षात दिनांक २९/०८/२०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली होती. सभेस ८२ सभासद ऑनलाईन उपस्थित होते.

**२) संचालक मंडळ सभा :**

अहवाल वर्षात एकुण १२ संचालकांचे मंडळ कामकाज सांभाळत असून, संचालक मंडळाच्या एकुण १२ सभा झाल्या. सभेत सर्व निर्णय सर्व संचालकांच्या मंजुरीने घेण्यात आले आहेत.

**३) सभासद :**

पतसंस्थेच्या आजपर्यंतच्या प्रगतीत सर्व सभासदांचा सहभाग व मोलाची साथ मिळालेली आहे. वर्षारंभी सभासद संख्या ६३४५ होती. अहवाल वर्षात ५०४ नवीन सभासद झाले असून, १४३ सभासदांनी राजीनामे दिल्यामुळे वर्षअखेर संस्थेचे ६७०६ सभासद आहेत. सर्व सभासदांनी संस्थेत सक्रीय सहभाग घेऊन क्रियाशील सभासद व्हावे, असे आवाहन करण्यात येते.

**४) भागभांडवल :**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. ५ कोटी आहे. वर्षारंभी वसूल भागभांडवल रु. ३,११,४३,३००/- होते. अहवाल वर्षात भागभांडवलात रु. २२,२६,१००/- जमा झाले असून, राजीनामा दिलेल्या सभासदांचे रु. ८,५८,५००/- भागरक्कम परत केली आहे. दि. ३१/०३/२०२२ अखेर रु. ३,२५,१०,९००/- वसूल भागभांडवल संस्थेकडे जमा आहे. वसूल भांडवल वाढीचे शे. प्रमाण ४.३९% असून, सरासरी खेळते भांडवलाशी वसूल भांडवलाचे प्रमाण ५.७५% आहे.

**५) राखीव निधी, ईतर निधी व तरतुदी :**

संस्थेचा दिनांक ३१/०३/२०२१ अखेर निधी रक्कम रु. ८,३२,८७,५९९.६५/- होता. अहवाल सालात त्यामध्ये रक्कम रु. १,५२,०४,०९३.५४ ची वाढ होऊन दि. ३१/०३/२०२२ अखेर संस्थेचा निधी रु. ९,८४,९१,६९३.१९/- झाला आहे. यापैकी राखीव निधीची गुंतवणूक स्वतंत्र बँक खाती रक्कम रु. १,७३,३२,१७७/- केलेली आहे. अहवाल वर्षात संस्थेचे निधीवाढीचे शे. प्रमाण १८.२५% आहे. सरासरी खेळते भांडवलाशी निधीचे शे.प्रमाण १७.४२% आहे.

**६) स्वनिधी :**

संस्थेची स्वनिधीतील वाढ म्हणजेच संस्थेच्या प्रगतीचा भक्कम पाया होय. दिनांक ३१/०३/२०२२ अखेर संस्थेचा स्वनिधी रक्कम रु. ७,२३,८२,४७७/- आहे.

**७) सभासद ठेवी :**

दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संस्थेच्या ठेवी रु. ४,०८२.२७ लाख होत्या. अहवाल वर्षात रु. १०४३३.९२ लाख ठेवी जमा होऊन, रु. ९८९५.९० लाख रकमेच्या ठेवी परत करण्यात आल्या. दि. ३१/०३/२०२२ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ४,६२०.२९ लाख इतक्या आहेत. गतवर्षीपेक्षा चालूवर्षी ठेवीत रु. ५३८.०२ लाखाची वाढ झालेली आहे. ठेव वाढीचे शे. प्रमाण १३.१८% असून, सरासरी खेळते भांडवलाशी ठेवीचे शे. प्रमाण ८१.७०% आहे. अहवाल वर्षात ठेवीवर संस्थेने रु. २९३.१२ लाख व्याज अदा केले आहे.

**८) गुंतवणुका :**

दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संस्थेची गुंतवणूक रु. १,३३२.१८ लाख इतकी होती. अहवालवर्षी त्यामध्ये रु. १८८.२० लाखाची वाढ होऊन अहवाल वर्षअखेर गुंतवणूक रक्कम रु. १,५२०.३८ लाख इतकी झाली आहे. अहवाल वर्षात

गुंतवणूक वाढीचे शे. प्रमाण १४.१३% आहे व सरासरी खेळत्या भांडवलाशी गुंतवणुकीचे शे. प्रमाण २६.८८% आहे. ३१/०३/२०२२ अखेरील गुंतवणुकीचा तपशील खालीलप्रमाणे.

| गुंतवणूक तपशिल | ३१/०३/२०२१ अखेर | ३१/०३/२०२२ अखेर |
|---|---|---|
| १. बँक गुंतवणूक | १३,२७,१३,४९५/- | १५,१४,६८,०११/- |
| २. भागातील गुंतवणुक | २०,०००/- | २०,०००/- |
| ३. ईतर गुंतवणूक | ४,८४,७७५/- | ५,४९,७७५/- |
| एकूण : | १३,३२,१८,२७०/- | १५,२०,३७,७८६/- |

### ९) सभासद कर्ज :

दिनांक ३१/०३/२०२१ अखेर संस्थेची सभासद कर्ज येणे बाकी ३,२२०.७० लाख इतकी होती. अहवाल वर्षात रु. ३,५८९.०० लाख इतके कर्ज वाटप करण्यात येऊन रु. ३,२०६.२८ लाख इतकी कर्ज वसुली करण्यात आली. दि. ३१/०३/२०२२ अखेर संस्थेची कर्ज येणे बाकी रु. ३,६०३.४२ लाख इतकी आहे. सरासरी खेळत्या भांडवलाशी येणे कर्जाचे शे. प्रमाण ६३.७२% आहे. संस्थेने सभासदांची कर्जविषयक गरज, परतफेड क्षमता, उपविधीतील कर्जविषयक नियम आणि ठेवीदारांच्या उपलब्ध ठेवींची सुरक्षितता अशी चौपदरी सांगड घालणारे कर्जवाटप धोरण निश्चित केलेले आहे.

एकुण २७७१ येणे कर्जदार खाती असून गतवर्षीपेक्षा येणे कर्जरकमेत रु. ३८२.७२ लाखाने वाढ झालेली आहे. एकुण कर्जापैकी तारणी कर्ज रु. २,७३५.२८ लाख असून, एकुण कर्जाशी शे. प्रमाण ७५.९१% आहे. विनातारणी कर्ज रक्कम रु. ८६८.१४ लाख असून शे. प्रमाण २४.०९% आहे.

### १०) संचालक व त्यांचे कुटुंबीय यांचे कर्ज :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२)(एक) व सभा सूचनापत्रातील विषय क्र. १० नुसार संचालक व त्यांचे कुटुंबीय यांची कर्जे दिनांक ३१/०३/२०२२ अखेर खालील प्रमाणे असून, संपूर्ण येणे कर्ज हे तारणी कर्ज आहेत.

(आकडे रु. लाखात)

| तपशिल | दि. ३१/०३/२०२१ अखेर येणे कर्ज | २०२१-२२ मधील | | दि. ३१/०३/२०२२ अखेर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वाटप कर्ज | वसूल कर्ज | कर्जदार | कर्ज रक्कम | थकीत रक्कम | थकबाकी |
| संचालक | ९.७० | -- | ९.७० | - | - | - | - |
| कुटुंबिय सदस्य | ११.६७ | -- | ३.२२ | १ | ८.४५ | निरंक | निरंक |
| एकुण : | २१.३७ | -- | १२.९२ | १ | ८.४५ | -- | -- |

संचालक व त्यांचे कुटुंबीय यांचेकडील कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ०.२३% आहे.

### ११) थकबाकी व एन.पी.ए. :

दिनांक ३१/०३/२०२२ अखेर संस्थेची एकुण येणे कर्जबाकी रु. ३,६०३.४२ लाख इतकी असून त्यापैकी रक्कम रु. ४७२.६९ लाख इतकी एन.पी.ए. थकबाकी आहे. एकुण कर्ज येणे बाकीशी एन.पी.ए.थकबाकीचे (ग्रॉस एनपीए) शे.प्रमाण १३.१२% इतके आहे. गतवर्षीपेक्षा यावर्षीच्या एन.पी.ए. प्रमाणामध्ये २.२२% ने घट झालेली आहे. ढोबळ व निष्क्रिय जिंदगीचे प्रमाण सहकार खात्याचे निर्देशानुसार ५% चे आत असणे आवश्यक आहे. संस्थेने एन.पी.ए. निधीची रु. ३०२.६७ लाख व उत्तम जिंदगीची रु. ८.०० लाख एकूण ३१०.६७ लाखाची तरतूद केलेली आहे. त्यामुळे संस्थेचा निव्वळ (नेट) एन.पी.ए. ५.१५% आहे. तर एनपीए खात्यावरील व्याज रु. १७९.२८ लाख तरतूद करावी लागली आहे. त्यामुळे थकबाकीदार कर्जदार सभासद व त्यांचे जामीनदार यांनी त्यांचेकडील थकीत कर्जरकमेचा भरणा करून, एन.पी.ए. चे प्रमाण कमी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येते.

### १२) ठेवी व कर्ज प्रमाण (C.D. Ratio) :

शासनाचे निकषानुसार व दिलेल्या सूत्रानुसार सी.डी.रेशोचे प्रमाण ७०% चे आत असावयास पाहिजे. संस्थेचे अहवाल वर्षअखेर ठेव व कर्जाचे (सी.डी.रेशो) प्रमाण ६९.३३% असून सदरचे प्रमाण हे शासनाने निर्धारित केलेले सी.डी. रेशोच्या प्रमाणात आहे.

**१३) सरासरी खेळते भांडवल :**

दि. ३१/०३/२०२१ अखेर संस्थेचे सरासरी खेळते भांडवल रु. ५३,६१,१५,८६२/- होते. दि. ३१/०३/२०२२ अखेरचे सरासरी खेळते भांडवल रु. ५६,५५,४०,१०४/- इतके आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलात रु. २,९४,२४,२४२/- ने उल्लेखनीय वाढ झालेली असून वाढीचे प्रमाण ५.४९% आहे.

**१४) लेखापरिक्षण :**

संस्थेचे सन २०२१-२२ चे वैधानिक लेखापरिक्षण सी.ए. श्रुतिका विनोद लोहाडे, सनदी लेखापाल, औरंगाबाद, यांनी केले असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. संस्थेच्या अहवाल सालातील कामकाजाचे सुयोग्य मूल्यमापन करत असतांना शासनाचे ऑडीट मुल्यांकन प्रणालीनुसार ९०.८०% गुण देऊन सन २०२१ - २०२२ या आर्थिक वर्षासाठी संस्थेस ऑडीट वर्ग " अ " दिलेला आहे. लेखापरिक्षण कालावधीत त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**१५) कर्मचारी वर्ग :**

संस्थेच्या यशस्वी विकासासाठी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्वाचे असते. धोरण ठरविणारे संचालक मंडळ असले तरी या धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे काम कर्मचारी वर्ग करीत असतो. कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत करून, संचालक मंडळाचे मार्गदर्शनाखाली काम केले आहे. संस्था संचालक मंडळाची ध्येय धोरणे प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी संस्थेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहित २५ कायम व तात्पुरते कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांच्या कार्यकुशल वृत्तीमुळे संस्थेची वाटचाल विकासाकडे चालू आहे.

**१६) प्रशिक्षण कार्यक्रम :**

संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी सलग ३ दिवसांचे सहकार विषयक प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. अहवाल सालात जालना येथे दिनांक ०१ ऑक्टोबर २०२१ ते ०३ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई या प्रशिक्षण संस्थेमार्फत संस्थेच्या संचालक व कर्मचारी यांचेकरिता प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. त्यामध्ये संस्थेचे सर्व कर्मचारी सहभागी होऊन, त्यांनी ३ दिवशीय प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

**१७) समारोप व आभार :**

संस्थेची आजची नेत्रदीपक प्रगती, प्राप्त झालेला नावलौकिक, मिळालेले वैभव हे सभासदांनी संस्थेस वेळोवेळी केलेले सहकार्य, मोलाचे मार्गदर्शन व संस्थेसाठीचा त्याग याचे फलित होय. त्यामुळे प्रथमतः सर्व सभासदांना धन्यवाद देऊन आभार मानतो. व भविष्यातही अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

संस्था प्रगतीपथावर आणण्यासाठी ठेवीदार सभासदांचा सर्वात महत्वाचा वाटा असतो. यावर्षी ठेवीमध्ये झालेली भरघोस वाढ, हि ठेवीदारांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचेच प्रतिक आहे. संस्थेच्या प्रगतीमध्ये ठेवीदार सभासदांनी जो सिंहाचा वाट उचलला आहे त्याबद्दल संस्था त्यांचे शतशः आभार मानून, ठेवीदाराच्या विश्वासास नेहमीच पात्र राहील अशी ग्वाही देतो.

संस्थेच्या बहुसंख्य सभासदांनी घेतलेल्या व जामीनदार असलेल्या कर्जाची वेळेवर व नियमित कर्जहफ्ते भरून संस्थेस वेळोवेळी सहकार्य केले, त्याबद्दल संस्था त्यांचेही आभार मानते व भविष्यातही असेच सहकार्य राहील हि अपेक्षा बाळगते.

मा. जिल्हा ऊपनिबंधक, सहकारी संस्था, जालना, मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, जालना, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जालना व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडेरेशन लि. यांनी संस्थेस वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. संस्थेचे नोकरदार सभासदांची कर्जाची गरज भागविण्यासाठी कर्जकपातीची हमी घेऊन व त्यानुसार वेळोवेळी कर्जहफ्ते कपात करून संस्थेकडे भरण्यासाठी सतत सहकार्य करणारे वेतनअधिकारी, कार्यालय प्रमुख, मुख्याध्यापक, अहरण व वितरण अधिकारी तसेच विविध शासकीय व निमशासकीय पगारपत्रक गटप्रमुख यांचेही संस्था मनःपूर्वक आभार मानते.

संस्थेच्या सर्व शाखांचे पालक संचालक व स्थानिक शाखा सल्लागार मंडळाने संस्थेस वेळोवेळी मार्गदर्शन करून शाखा वृद्धीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत, मी त्यांनाही धन्यवाद देऊन आभार व्यक्त करतो. संस्थेचे कायदा सल्लागार, पॅनलवरील वकील, इंजिनियर, गोल्ड व्हॅल्युअर यांनी संस्थेच्या प्रत्यक्ष कामकाजात सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही संस्था आभार मानते.

संस्थेची यापुढेही उत्तरोत्तर आर्थिक उन्नती होवो व सर्व सभासदांमध्ये बंधुभाव कायम राहून सहकार्याची भावना वृद्धिंगत होवो, हि सदिच्छा व्यक्त करून आम्ही हा अहवाल पूर्ण करीत आहोत. जय सहकार !

आपला स्नेहांकित,
डॉ. जगन्नाथ खंडागळे
अध्यक्ष

## * श्रद्धांजली *

अहवाल सालात दिवंगत झालेले विविध क्षेत्रातील मान्यवर,
सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, थोर साहित्यिक,
ज्ञात-अज्ञात थोर विचारवंत, भारतभूमीचे रक्षण करतांना व
दहशतवाद्यांशी सामना करतांना शहीद झालेल्या जवानांना
तसेच दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, यांना
आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.
दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दुःखात महालक्ष्मी पतसंस्था परिवार सहभागी असून,
मृतांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**बुक पोस्ट**

श्री व श्रीमती ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

**महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना**
(नोंदणी क्र. जेएएल/जेएएल/आरएसआर/सीआर/348/1995-96, दि.19/02/1996)
**मुख्य कार्यालय : मस्तगड, जालना**
**संपर्क क्र. (०२४८२) २३३७४२, ७५५९३९४८५७.**